प्रसिध्दी पत्रक

दिनांक : १६/१०/२०२४

**तक्रारदार यांचे प्लॉटचे गुंठेवारी करण्याकरीता महानगरपालीकेचे संभाजी माधवराव काष्टेवाड प्रभारी सहायक आयुक्त व महेंद्र पठाडे प्रभारी वसुली लिपीक यांनी २१,५००/— रूपयांची लाच स्विकारली म्हणुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| पोलीस ठाणे | नांदेड ग्रामिण |
| गुन्हा रजिस्टर नंबर | गुरनं ९२३/२०२४ कलम ७ भ्र.प्र.अ १९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक १६.१०.२०२४ रोजी ०१.३१ वाजता |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | १) संभाजी माधवराव काष्टेवाड, पद — प्रभारी सहा. आयुक्त, नेम. नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका, क्षेत्रीय कार्यालय क्रमांक ६, सिडको, नांदेड. रा. बसवेश्वर नगर, नांदेड.<br>२) महेंद्र जयराम पठाडे, पद — प्रभारी वसुली लिपिक, नेम. नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका, क्षेत्रीय कार्यालय क्रमांक ६, सिडको, नांदेड. रा. वैभव नगर, नांदेड. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. २५,०००/— (ज्यामध्ये प्लॉटचे टॅक्स ३४९९/— रूपये, दोन प्लॉटची नामपरिवर्तन फि १३६७०/— रूपये व उर्वरित ७८३१/— रूपये लाच) |
| लाच स्विकारली रक्कम | रु. २१,५००/— |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांनी मौजे असदवन येथे सन २०२१ मध्ये १२ प्लॉटस् खरेदी केले होते. त्यापैकी त्यांना प्लॉट क्र. २ व ३ ची गुंठेवारी करणे असल्याने त्यांनी महानगरपालीका येथे जावून माहिती घेतली. नमूद प्लॉट हे यापूर्वीचे मालकाच्या नावाने दाखवत असल्याने त्यांनी म.न.पा. झोन क्र. ६ मध्ये जावून सहा. आयुक्त काष्टेवाड यांची भेटले असता, त्यांनी सदर भागाचे बिल कलेक्टर महेंद्र पठाडे आहेत, तुम्ही त्यांना भेटा, मी त्यांना सांगतो. त्याप्रमाणे पुर्तता करा. तुमचे काम होवून जाईल असे म्हणाले. त्यावरून तक्रारदार हे बिल कलेक्टर महेंद्र पठाडे यांना भेटले असता त्यांनी तक्रारदार यांना दोन प्लॉटचे २५,०००/— रूपये लागतील त्यात दोन प्लॉटचे पावत्या मिळून जातील, उर्वरित काष्टेवाड साहेबांचे व माझे असतील असे सांगितले. सदरचे उर्वरीत रक्कम ही लाच असल्याची तक्रारदार यांना खात्री झाली. त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे याबाबत तक्रार दिली.<br>नमुद तक्रारीवरून ला.प्र.वि., नांदेडकडून दिनांक ०९/१०/२०२४ रोजी लाच मागणी पडताळणी कार्यवाही करण्यात आली. कार्यवाहीत आलोसे महेंद्र पठाडे यांनी तक्रारदार यांचेकडून पूर्वी मागितलेल्या २५,००० रुपयापैकी प्लॉटचे ३४९९/— रूपयाचे टॅक्स भरून शासकीय पावती दिली व उर्वरित राहिलेल्या लाचेची पंचासमक्ष मागणी केली.<br>त्यानंतर दि. १५/१०/२०२४ रोजी आलोसे संभाजी काष्टेवाड यांनी लाच मागणी पडताळणीमध्ये पंचासमक्ष लाच स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर आलोसे महेंद्र पठाडे यांनी तक्रारदार यांच्याकडून दोन प्लॉटसचे १३६७०/— रूपयाची दोन प्लॉटची नामपरिवर्तन फि व उर्वरित ७८३१/— रूपयाची लाच असे एकुण २१५००/— रूपये महानगरपालीका क्षेत्रीय कार्यालय क्र. ६ सिडको, नांदेड येथे पंचासमक्ष स्विकारतांना रंगेहाथ मिळून आला असल्याने यातील आरोपी लोकसेवकास ताब्यात घेण्यात आले असून पोलीस स्टेशन नांदेड ग्रामिण, जि.नांदेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| मार्गदर्शक | श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परीक्षेत्र नांदेड |
| पर्यवेक्षक अधिकारी | श्री. प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड |
| गुन्हयाचा तपास | श्रीमती स्वप्नाली धुतराज, पोलीस निरीक्षक, लाप्रवि नांदेड, हे करीत आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
| संपर्क कमांक :— 02462—253512<br>टोल फ्री कमांक— 1064 | ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9545531234 | पोलीस उपअधीक्षक 9870145915 |
| ई—मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई—मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| FACEBOOK – Dysp Acb Nanded | TWITTER - @ACBnanded |
| INSTAGRAM – acb_nanded | |

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

Scanned with CamScanner